नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२५ Issue - 225 | वार बुधवार दि. १ जानेवारी २०२५ Blow- Wednesday Date 1 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही, सर्वांना शोधून काढले जाईल



## संतोष देशमुख हत्या प्रकरण; गुंडांचे राज्य चालू देणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विरोधकांना उत्तर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : संतोष देशमुख हत्या प्रकरणाचे पडसाद हे विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनातही उमटले. त्यानंतर सातत्याने एक नाव चर्चेत येत होतं ते नाव होतं वाल्मिक कराड. वाल्मिक कराड आज पुणे सीआयडी कार्यालयात शरण आले. त्यानंतर या प्रकणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. माध्यमांशी बोलत असताना फडणवीस म्हणाले, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रत्येक आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल, हे मी पहिल्या दिवसांपासून सांगत आलो आहे. कुणालाही अशाप्रकारची हिंसा करण्याचा अधिकार नाही. सर्व दोषी जोपर्यंत फासावर लटकत नाहीत, तोपर्यंतची सर्व कारवाई पोलीस करतील. यावेळी त्यांना धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याविषयीही प्रश्न विचारला गेला त्याचंही उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर चर्चेत आलेले वाल्मिक कराड हे आता पुण्यातील सीआयडी कार्यालयात पोलिसांना शरण आले आहेत. शरण येण्यापूर्वी त्यांनी स्वतःचा एक व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये त्यांनी स्वतःवरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राजकीय द्वेषापोटी माझ्याविरोधात आरोप केले जात असून जर पोलिस तपासात मी दोषी आढळलो तर जी शिक्षा होईल, ती भोगण्यासाठी मी तयार असल्याचे ते म्हणाले आहेत. वाल्मिक कराड शरण आल्यानंतर विविध प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत भाष्य केलं. विरोधकांकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जाते आहे त्याबाबतही देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं.

गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. कुणालाही अशाप्रकारे हिंसा करता येणार नाही, खंडणी मागता येणार नाही. त्या अनुषंगाने आम्ही तपासाला गती दिली असून त्यामुळेच वाल्मिक कराड यांना शरणागती पत्करावी लागली. आता हत्येतील फरार आरोपींना पकडण्यासाठी वेगवेगळी पथके कामाला लागली आहेत. कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही. सर्वांना शोधून काढले जाईल.

कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून सातत्याने केली जाते आहे. त्याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला या प्रकरणातील राजकारणात जायचे नाही. मी आधीपासून सांगत आलो आहे की, जे पुरावे समोर येतील त्यानुसार कारवाई केली जाईल. माझ्याकरिता स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येला कारणीभूत लोकांना शिक्षा होणे हे महत्त्वाचे आहे. काही लोकांना केवळ राजकारण महत्त्वाचे आहे. त्यांना त्यांचे राजकारण लखलाभ. मला कुठल्याही राजकारणात जायचे नाही. त्यांनी त्यांचे राजकारण करत राहावं. आमची भूमिका स्पष्ट आहे ती म्हणजे स्वर्गीय संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देणं. तो आम्ही मिळवून देणारच.

# वाल्मिक कराड सीआयडीसमोर शरण

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पुणे: बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी केसमधील आरोपी वाल्मिक कराड मंगळवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. २२ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या कराडनं आत्मसमर्पण अनेक महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या आहेत. यातील काही गोष्टी कायदेशीर, तर काही गोष्टी धोरणात्मक पद्धतीनं जुळवून आणण्यात आल्या असं म्हणण्यास वाव आहे.


वाल्मिक कराडवर बीडमधील केज तालुक्यात खंडणीचा गुन्हा दाखल आहे. याच प्रकरणात त्याच्यावर गुन्हा नोंद होताच तो फरार झाला. तिथल्या स्थानिक पोलिसांनी या प्रकरणाचा नीट तपास केला नाही. म्हणून बीड पोलीस अधिक्षकांची बदली झाली. त्यानंतर हे प्रकरण सीआयडीकडे देण्यात आलं. सीआयडीचं मुख्यालय पुण्यात आहे. पुण्यात कराडवर कोणताही गुन्हा नाही. प्रकरणाचा तपास सीआयडीकडे आल्यावर कराड शरण आला ही बाब महत्त्वाची आहे.

माझ्यावरील खंडणीचा गुन्हा खोटा आहे. हा गुन्हा जामीनपात्र आहे. पण मी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केलेला नाही. मी सीआयडीला शरण जातोय, असं कराडनं आत्मसमर्पणाआधी म्हटलं. सीआयडीनं अटक करण्यापूर्वी शरणागती पत्करल्याचा फायदा कराडला न्यायालयात होईल. या मुद्द्याचा वापर त्याच्या वकिलांकडून युक्तिवाद करताना केला जाऊ शकतो. आरोपी पळून जाऊ शकतो. तो अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करु शकत होता. पण तसं न करता तो शरण आला, असा युक्तिवाद कराडचे वकील करु शकतात. वाल्मिक कराड हा गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडेंच्या पुण्यातील घरीच लपला होता, असा एक कयास आहे.

# हिंसाचाराच्या मुद्द्यावर मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांनी मागितली जाहीर माफी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : मागील बऱ्याच दिवसांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. विरोधी पक्षांकडून या मुद्द्यावरून केंद्र सरकारला कायम लक्ष्य केले जाते. यादरम्यान आज (३१ डिसेंबर) वर्षाच्या शेवटच्या दिवशी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर खेद व्यक्त करत माफी मागितली आहे. ३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये हिंसाचार होत असून यामध्ये आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक बेघर झाले आहेत.



पत्रकार परिषदेत या मुद्द्यावर त्यांनी पहिल्यांदाच भाष्य केले, ते म्हणाले की, हे संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला खेद वाटतो आणि गेल्या ३ मे पासून आजपर्यंत जे काही घडत आहे त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागू इच्छितो. मुख्यमंत्री पुढे बोलताना म्हणाले की घटनांमध्ये अनेकांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे आणि अनेकांना आपले घर सोडून जावे लागले. मला याचा खूप खेद वाटतो. मला सर्वांची माफी मागायची आहे.




### सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट

# विजयस्तंभ परिसराच्या विकासाकरीता १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे, (कमलाकर सोनकांबळे) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभास भेट दिल्याच्या घटनेला सन २०२७ मध्ये १०० वर्ष पूर्ण होणार आहेत, या पार्श्वभूमीवर परिसराचा सर्वांगीण विकास करण्याकरीता १०० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट म्हणाले.

हवेली तालुक्यातील मोजै पेरणे येथे १ जानेवारी रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या पूर्व तयारीच्या पाहणीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र. समाज कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था तथा बार्टीचे महासंचालक सुनील वारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उप विभागीय अधिकारी यशवंत माने, पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, तहसीलदार तृप्ती कोलते, शिरुर गट विकास अधिकारी संदीप ढोके, हवेली गट विकास अधिकारी भूषण जोशी, समाज कल्याण सहायक आयुक्त विशाल लोंढे, विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांनी विजयस्तंभास पुष्प अर्पण करुन अभिवादन केले, यावेळी



ते पुढे म्हणाले, येत्या १ जानेवारी २०२५ रोजी पेरणे येथे आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत, उत्साहात साजरा करणे सर्वांची जबाबदारी असून या भावनेने प्रशासनास सहकार्य करावे.

दरवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी आतापर्यंत १४ कोटी रुपयाहून अधिक निधी खर्च करण्यात आलेला आहे. या ठिकाणी राज्यभरातून लाखो अनुयायी येत असल्याने त्यांची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. अनुयायींची कोणतीही गैरसोय होणार नाही, त्यांना आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उत्तम नियोजन करावे. विविध सामाजिक संघटनांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी. येत्या काळात परिसराचा कायमस्वरूपी विकास करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल, असेही मंत्री श्री. शिरसाट म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायांची संख्या विचारात घेऊन सोहळा शांततेत, उत्साहात, सौदर्यपूर्ण वातावरण साजरा करण्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्यावतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पेरणे येथे विविध आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन त्यांच्या सूचनाही विचारात घेतल्या जात आहेत. येणाऱ्या अनुयायींना सर्व सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही श्री. पाटील म्हणाले. यावेळी विजयस्तंभ सजावट, प्रकाशव्यवस्था, स्टॉल, मंडप उभारणी, गर्दीचे व्यवस्थापन, अनुयायांचे आगमन आणि प्रयाण व्यवस्था, वाहनतळ, वाहतूक आराखडा, आरोग्य सुविधा, भोजनव्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय उभारणी, स्वच्छता, बुक स्टॉल, कायदा व सुव्यवस्था, आपत्कालीन प्रसंगी अग्नीशमन वाहनांची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, आपत्ती व्यवस्थापन आदींबाबत माहिती देण्यात आली.

## संपादकीय....

### आत्मसमर्पण

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी केसमधील आरोपी वाल्मिक कराड मंगळवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. २२ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या कराडनं आत्मसमर्पण अनेक महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या आहेत. यातील काही गोष्टी कायदेशीर, तर काही गोष्टी धोरणात्मक पद्धतीनं जुळवून आणण्यात आल्या असं म्हणण्यास वाव आहे. वाल्मिक कराडवर बीडमधील केज तालुक्यात खंडणीचा गुन्हा दाखल आहे. याच प्रकरणात त्याच्यावर गुन्हा नोंद होताच तो फरार झाला. तिथल्या स्थानिक पोलिसांनी या प्रकरणाचा नीट तपास केला नाही. म्हणून बीड पोलीस अधिक्षकांची बदली झाली. त्यानंतर हे प्रकरण सीआयडीकडे देण्यात आलं. सीआयडीचं मुख्यालय पुण्यात आहे. पुण्यात कराडवर कोणताही गुन्हा नाही. प्रकरणाचा तपास सीआयडीकडे आल्यावर कराड शरण आला ही बाब महत्त्वाची आहे. माझ्यावरील खंडणीचा गुन्हा खोटा आहे. हा गुन्हा जामीनपात्र आहे. पण मी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केलेला नाही. मी सीआयडीला शरण जातोय, असं कराडनं आत्मसमर्पणाआधी म्हटलं. सीआयडीनं अटक करण्यापूर्वी शरणागती पत्करल्याचा फायदा कराडला न्यायालयात होईल. या मुद्द्याचा वापर त्याच्या वकिलांकडून युक्तिवाद करताना केला जाऊ शकतो. आरोपी पळून जाऊ शकतो. तो अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करु शकत होता. पण तसं न करता तो शरण आला, असा युक्तिवाद कराडचे वकील करु शकतात. वाल्मिक कराड हा गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडेंच्या पुण्यातील घरीच लपला होता, असा एक कयास आहे. फरार आरोपी त्यांचं लोकेशन सातत्यानं बदलत असतात. पण तसं न करता कराड पुण्यात एका जागी लपून बसला असेल तर त्यामागे असलेल्या शक्तीचा, ताकदीचा अंदाज येऊ शकतो. सीआयडी आता आरोपपत्रात कोणती कलमं लावते, त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. सीआयडी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असलेल्या गृह मंत्रालयाच्या अखत्यारित येते. कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय आहे. मुंडे यांनी कालच फडणवीसांशी भेट घेतली. त्यानंतर आज कराड हजर झाला, याकडे विरोधी पक्षातील काही नेत्यांनी लक्ष वेधलं.

## सोलापूर जिल्ह्यातील सन २०२५ वर्षातील स्थानिक सुट्ट्या जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सन २०२५ या वर्षातील स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाहीर केल्या आहे.सन २०२५ या वर्षात तीन स्थानिक सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. यामध्ये मंगळवार दि . १४ जानेवारी २०२५ रोजी मकरसंक्रात, सोमवार दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी घटस्थापना, सोमवार दि.२० ऑक्टोबर २०२५ रोजी नरक चतुर्दशी , या सुट्ट्यांचा समावेश आहे.

या स्थानिक सुट्ट्या जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय,कोषागार कार्यालये यांना लागू राहतील.

# वृद्धाश्रम - .... सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचा संकल्प यातील एक चिंतनीय विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वृद्धाश्रम म्हणजे माणुसकी लोप पावत जाणाऱ्या भावनाशून्य लोकांच्या वृद्ध आई-वडिलांना नातेवाईकांना शरीराने जिवंत ठेवण्याचे ठिकाण . साधा प्रश्न आहे माणूस हौसेने आनंदाने वृद्धाश्रमात जातो का? खरच त्याला त्यांची मुले नातवंडे घर संसार सोडून राहावं वाटत असेल का? ज्या संसाराची मुलांच्या प्रगतीशील भविष्याची स्वप्न रंगवणारे हे आईबाप, नातवंडांना अंगा खांद्यावर खेळवण्यासाठी आतुर-लेले आजी-आजोबा . उतार वयात मुलांच्या नातवंडांच्या सुखात आ-पला आनंद शोधणारे, माणुसकीच्या प्रेमाच्या आपुलकीच्या मायेच्या स्पर्शासाठी आतुरलेले. काळजीच्या दोन शब्दांसाठी आसुसलेले हे आपल्या सर्वांचेच मायबाप ! स्वतःच्या स्वप्नांना सुखांना इच्छांना तिलांजली देऊन मुलांची स्वप्न पूर्ण करतात . पोटाला चिमटे काढून आपली हौस मौज दूर ठेवून मुलांची हौसमौज भागवतात. आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी अह-ोरात्र झटतात. त्यांच्या म्हातारपणा-ची त्यांच्या राहणीमानाची त्यांच्या बोलीभाषेची आपल्याला मात्र लाज वाटते ! आपलं बोट धरून चालायला बोलायला शिकवणारी माणसं माणसात बसवणारी उच्च पदावर बसवणारी मायम ाऊली ती आता आपल्याला अडाणी वाटते. तिला काही समजत नाही कळत नाही हा आपला समाज (जिने खायला प्यायला चालायलाआणखी काय - काय आपल्याला शिकवलं )ते आपल्या सोबत राहिले तर आपल्याला कमीपणा वाटतो त्यांच्यामुळे आपल्याला इम्बॅरस होतं हे आपण असे सुसंस्कृत.

आपल्या आजारपणात उलट्या संडास साफ करणाऱ्या रात्र रात्र जागणाऱ्या, एका शिळ्या भाकरीवर एका वडापाव वर दवाखान्यात दिवस करणाऱ्या आई बापांना त्यांच्या म्ह-ातारपणी तुम्ही कसे आहात ? हे विचारायला देखील वेळ नाही किंबहुना त्यांना ते विचारण्याची आवश्यकताही वाटत नाही ! अरे ज्या आई-वडिलांच्या मांडीवर आपण घाण केली म्हणून त्यांनी मांडी कापली नाही. त्याच आई वडिलांना आपण चक्क घराबाहेर काढून वृद्धाश्रमात ठेवतो. लाज वाटायला हवी आपल्याला त्याच आई-वडिलांच्या संपत्तीवर मजा मारायला त्यांच्याच कर्तृत्वावर मोठेपण मिळवायला.

अशाच आपल्यासारख्या कृतघ्न लोकांमुळेच उदयास आलेली संस्था म्हणजे वृद्धाश्रम. आज कित्येक आई बापाने सर्व संपत्ती विकून मुलांना परद-ेशी पाठवले ती मुलं परदेशातच सेटल झाली. सुरुवातीची विचारपूस गाठीभेटी हळूहळू बंद होतात शेवटी अंत्यविधीला सुद्धा ही मुलं हजर राहू शकत नाहीत !परदेशातूनच जन्मदात्यांना पॅकेजची श्रद्धांजली वाहतात. अशी बोथट भावनांची जिवंत उदाहरण आपण पाह-तोय . अशी वेळ येण्यापेक्षा नवरा-बायको वांझ राहिलेले काय वाईट ?

सध्या कित्येक घरामध्ये मुलांचा सुसंवाद आई बापांशी होत नाही . नातवंडांना स्पर्श करण्याचा अधिकारही आजी-आजोबांना नसतो . त्यांच्या कुठल्याही निर्णयात आई वडिलांचा हस्तक्षेप चालत नाही . एवढेच काय तेच घरात चालत नाहीत. म्हणून तर हा उपद्व्याप म्हणजे वृद्धाश्रम.

आजकालची पोरं म्हणजे दुसरा कोरोनाच म्हणायला हवा. आज-ारी आईबापा जवळ नाकाला रुमाल लावून जातात (मास्क ) भांडे कपडे वेगळे ठेवतात .शेजारच्या खोलीत वि व्हळले कणले खोकले रडले शेवटी म रून पडले तरी माहिती होत नाही हो ! मग त्यांच्यासोबत त्यांच्या आठवणीही घराबाहेर. आहे की नाही कोरोना सारखेच वास्तव .मग आपणही एक प्रकारचा कोरोनाच की ?मग या सर्व यातनातूनच वृद्धाश्रम जन्माला आला असावा.

ज्या वयात जास्त आधाराची आ-पलेपणाची काळजीची गरज असते त्याच वयात आपण त्यांना वृद्धाश्रमात सोडतो . म्हणतात ना बालपण आणि म्हातारपण सारखंच असतं मग आपण जन्मल्याबरोबर आपल्यालाही एखाद्या अनाथाश्रमात सोडलं असतं तर ? आज आपलं काय झालं असतं ? कुणी अधिकार दिला हो आपल्याला त्यांना वृद्धाश्रमात सोडण्याचा ? आपणही आईबाप आहोतच की काही होणार असतील काही होतील आपल्यावर तर यापेक्षाही कुठलातरी भयानक आश्रम येऊ शकतो !हा विचार तारुण्यात म नात येत नसावा बहुदा पण वेळ विचार करण्याची आहे.

ज्यांना स्वतःच्या घरात राहता येत नाही असे कित्येक आई बाप आहेत जे स्वतःच्या मुलांच्या छळाला कंटाळून स्वतःहून वृद्धाश्रमात राहण्याचा निर्णय घेतात .काहीही करा हो पण त्यांचं अस्तित्व त्यांच्यापासून हिरावून घेऊ नका.

आपण एवढेही भावना शून्य वागलो तरीही मायबाप कायम लेकरांच्याच भल्याचाच विचार करतात .आश्चर्याची गोष्ट ही म्हणजे जगभरातल्या आदर्श प्रसिद्ध अशी भारतीय संस्कृती जिथे राम ायण महाभारतासारखे महाकाव्य घडले त्या सुसंस्कृत पारंपारिक देशात वृद्धाश्रम ही संकल्पना मुळ रोवते. त्याहून अधिक खेदाची बाब म्हणजे महाराष्ट्रासारख्या संतांचा वारसा असणाऱ्या भक्तिमार्ग राम कथा पुंडलिक कथा जन्माला घालणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या या पावन पवित्र मातीत वृद्धाश्रम रुजतोय ! धिक्कार आहे माणूस म्हणून जन्म ाला येण्याचा. महाराष्ट्रात वृद्धाश्रमांची वाढणारी संख्या म्हणजे बोथट भावना. लो पपाबत चाललेली संस्कृती. ही अतिशय चिंतनीय बाब असून ती काळाची चिंता बनत चालली आहे. वृद्धाश्रम हा कलंक आहे आपल्यासाठी आणि का नसावा तो कलंक ? तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपणारी मुलं असताना सुद्धा आई वडील वृद्धाश्रमात जातात .किलकि लनाऱ्या डोळ्यातले अश्रू सुद्धा आपल्याला पाझर फोडत नाहीत !

आपल्याला हौस म्हणून फॅशन म्हणून कुत्री मांजर पाळली जातात. आपल्या घरात या कुत्र्या मांजरांसाठी जागा असते. स्वतंत्र जागा असते ! पण वृद्ध आई-वडिलांची मात्र अडचण होते ? या प्राण्यांसाठी महागडी औषधे वॅक्सिन स्पेशल डॉक्टर स्पेशल फूड हे सगळं मोठ्या जबाबदारी आपण करतो. पण जन्मदात्यांचे आजारपण ते जेवले का ? कसे आहेत ? बरे आ-हेत का ? याची चौकशीही आपल्याला करावीशी वाटत नाही. या प्राण्यांसोबत खेळायला आपल्याला वेळ असतो पण आई वडिलांचे विचारपूस करण्यासाठी वेळ नसतो. या प्राण्यांच्या शि - शूच्या वेळा सुद्धा आपण करेक्ट पाळतो. बरोबर वेळ झाली की त्यांना बाहेर नेतो. तोच हात तोच आधार आपल्या थरथरणाऱ्या आई-वडिलांना देतो का ? न चुकता सकाळ संध्याकाळ या प्राण्यांना फिरायला नेतो एवढीच काळजी आपल्या म्हाताऱ्या आई वडिलांच्या आरोग्याची घेतली तर कशाला राहतील हे वृद्धाश्रम ? जेवढी किंमत आपल्या नजरेत त्या प्राण्यांना आहे तेवढी तरी किंमत काळजी आपण आपल्या आई-वडिलांना देतो का? या प्राण्यांची देखभाल अवश्य करा हो पण वृद्ध आई-वडिलांना निराधार करू नका. जनावराएवढी ही जागा आपल्या घरात आपल्या आईबापांना नाही का हो विचारा प्रश्न स्वतःला.

कुटुंबाचा आधार असणाऱ्या वृद्धांची वृक्षांची मूळचंआपण तोडून फेकून देऊ लागलो तर वृक्ष कसे उभे राहतील ? म्हणूनच तर वृद्ध जाणते अनुभवांची शिकवण देणारी आजी-आजोबा घरात नाहीत म्हणून अल्पवयीन मुलांच्या आत्महत्या कौटुंबिक आत्महत्या अल्पवयीन शोषण उध्वस्त होणारे कुटुंब अशा अनेक असंख्य समस्या आज आपल्यासमोर उभ्या आहेत . म्हणून कुटुंब असुरक्षित वाटतात . चांगलं वाईट सांगणारी योग्य दिशा देणारे मनोबल वाढवणारे हे म्हातारे लोक नको असतात . हल्ली सर्वांचं एकच वाक्य प्रिय झालं आहे - 'तुमच्या काळात असं नव्हतं आणि आताच्या काळातल तुम्हाला काही कळत नाही'.

तंत्रज्ञान वाढलं म्हणून भावना बदलत नाहीत. मला तर अशी भीती वाटत आहे की भावना म्हणजे काय ? नातेवाईक म्हणजे काय ? आजी आजोबा म्हणजे काय ? काका मावशी मामा म्हणजे काय ? नातवंड म्हणजे काय ? या सर्वांच्या व्याख्यांचा सम ावेश आपल्याला अभ्यासक्रमात करावा लागेल' आणि भविष्यात याची उद-ाहरणे देणेदेखील अवघड होईल. यावर चर्चा चिंतन व्हायला हवेत. या स्पर्धे त मी आणि माझं याशिवाय विचार करायला वेळच कोणाकडे आहे ?

लहानपणी दिवसभर कष्ट करणाऱ्या राबणाऱ्या आईच्या मळक्या घामाने ओल्या झालेल्या पदराला हात पुसताना आईने तोच पदर आपल्या चेहऱ्यावरून फिरवताना होणारा निस्वार्थ प्रेमाचा आनंद स्पर्श . वेळी अवेळी कामावरून घरी परतणाऱ्या बापाला बिलगताना होणारा प्रेमाचा स्पर्श आनंद त्या आनंदाला प्रेमाला कधी घामाचा वास आला नाही . कधी मळक्या कपड्याची घाण वाटली नाही . पण आज मात्र त्या आई वडिलांचा वास येतो घाण वाटते.

म्हणून वृद्धाश्रमासारखा शाप नको हो आपल्याला. सरत्या वर्षा सोबत चिंतन म्हणून आणि येणाऱ्या वर्षाचे स्वागत संकल्प म्हणून वृद्धाश्रम व आपण आपले आईबाप भावनिक कौटुंबिक मूल्य यांचा विचार करायला हवा कारण ती काळाची गरज आहे आणि तो आपला सांस्कृतिक वारसा आहे तो आपण जपला पाहिजे. आणि आपल्या सारख्या सुसंस्कृत माणसावरून वृद्धाश्रमाचा कलंक हटवला पाहिजे.



**श्रीमती रिंकू अनंतराव जाधवर** (धस) mob -९४०३४४९२८५
विषय शिक्षिका
जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे.
ता . अक्कलकोट जि - सोलापूर

# शुरविरांना वंदन करण्याचा अधिकार आहे का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शुरविरांना लाखोंच्या संख्येने वंदन करायला लोक कोरेगांव भिमा येथे जातात. आपण डोळसपणे विचार केला तर असे दिसुन येते की नागपूर, मुंबई, छ. संभाजी नगर पुर्वीचे औरंगाबाद, कोरेगांव भिमा येथे ठराविक दिवशी लाखोंच्या संख्येने स्वतःला बौद्ध म्हणवून घेणारे लोक जातात. गर्दी प्रचंड असते हे कोणीही नाकारु शकत नाही. एक जानेवारी कोरेगांव भिमा, १४ जानेवारी औरंगाबाद, अशोक विजया दशमी नागपूर व औरंगाबाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन मुंबई येथे लाखोंच्या संख्येने लोक जमतात, करोडो रुपयांची पुस्तक विक्री होते हे खरे असले तरीही झालेली गर्दी आणि विकल्या गेलेल्या पुस्तकांचा सामाजिक पातळीवर अपवाद वगळता कुठेही फायदा होताना दिसत नाही. उदाहरण म्हणून बघायचे झाले तर १४ जानेवारी ला विद्यापीठ नाम विस्तार दिन दरवर्षी लाखोंच्या संख्येने लोक एकत्र येऊन साजरा केला जातो. विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे यासाठी जिवाची बाजी लावून एकीकरणाद्वारे नामांतर लढा यशस्वी केल्या गेले. परंतु विद्यापिठाच्या कमानीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आल्यानंतर विद्यापिठातील विद्यार्थ्यांच्या समस्या संपल्या का? विद्यापिठातील शिक्षणाचा दर्जा वाढला का? आणि याचे उत्तर नाही असेल तर विद्यापीठ नामविस्तार दिनी गर्दी करण्याचा फायदा का? तीच बाब विजया दशमी दिनी लागु होते. डोक्यात विषमता, अंधविश्वास घेऊन एक दिवस अशोक विजया दशम ीला धम्माचा आव अंगात आणणे किती योग्य आहे? महापरिनिर्वाण दिनी मुंबई ला लाखों लोक जातात परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गाने, विच-ाराने चालणारे लोक किती आहेत? यावर मात्र विचार विनीमय होणे गरजेचे आहे. तिच परिस्थिती एक जा-नेवारी कोरेगांव भिमाला जाऊन पाचशे शुरविरांना वंदन करण्यासाठी लाखों लोक जमा होतात. गर्दी करतात आणि परत येतात. पण एक दिवस शूर झालेले लोक वर्षेभर लाचार व गुलाम म्हणून जिवन जगतात याची किव येते. आपण जर कोरेगांव भिमाचाच विचार केला तर आपल्या लक्षात येईल की पाचशे शुरविर पूर्वजांनी अठ्ठावीस हजार पेशवे कापुन टाकले याचे कारण होते पेशव्यांचे वाढते अन्याय अत्याचार, पेशव्यांनी येथील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व राजसत्ता एकहाती घेऊन केवळ विषमता आणि भेदभावाच्या जोरावर येथे माणसाला गुलामा सारखी वागणूक देऊन त्यांचे शोषण केले जात होते. वाढता अन्याय अत्याचार हा पाचशे शुरविरांनी कोरेगांव भिमाच्या लढाईत अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून आपला विजय मिळवला. पेशव्यांच्या विरोधात महार बटालियन लढली पण या महार बटालियन मध्ये बहुसंख्य महार असले तरी-ही इतरीही जातींच्या लोकांचा समावेश होताच. हे सांगण्यामागचा उद्देश हाच कि पेशव्यांचा त्रास येथील सर्वांनाच होता. म्हणून अन्यायकारी पेशव्यांना नष्ट करण्याची संधी महार बटालियन कडे आली आणि त्या संधीचे सोने करून. अन्याय अत्याचारी राजवट नष्ट केली. बर पाचशे लोकांना कसे शक्य झाले?



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

हा विषय खूप गहन व प्रेरणादायी आहे. पेशव्यांचे अन्याय अत्याचार एवढे वाढले होते की येथे माणस-ाला माणूस म्हणून जिवन जगने अवघड झाले हो-ते. पेशव्यांच्या जाचाला कंटाळले होते. आणि पेशव्यांबद्दल द्वेष हा समाजामध्ये निर्माण झाला होता. अन्याय व अत्याचाराचे गांभीर्य लक्षात घेऊन महार बटालियन एकीने स्वाभिमानासाठी लढली म्हणून विजय मिळवता आला. त्याच शुरविरांच्या विजयांचे प्रतिक म्हणून जयस्तंभ उभा केला गेला आहे. आणि याच शुरविरांच्या शौर्याला वंदन अर्थात जयस्तंभाला वंदन करण्यासाठी एक जानेवारी ला सर्वात अगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यानंतर दरवर्षी आपण जातो. पण आजची परिस्थिती पाहली तर आपल्याला कोरेगांव भिमाला जाण्याचा अधिकार आहे का? त्या शुरविरांकडून आपण काही शिकलो का? अन्याय अत्याचार गाडण्यासाठी ते पाचशे एकत्र आले आणि स्वाभिमानासाठी लढले. आम्ही लाखोंच्या संख्येने जातो पण आमच्या मध्ये एकी आणि स्वाभिमान आहे का? स्वतःला आंबेडकरवादी समजून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने समाजकारण, राजकारण करून हजारो नेते तयार झाले आणि समाजातील लोकांचे विघटन करून समजाची ताकद कमकुवत केल्या गेली. स्वार्थापोटी तयार झालेले व खंडणीवर जगणारे नेते व त्यांचे चलेचपाटे हे कोरेगांव भिमाला जाऊन काय साध्य करतात? एकिने स्वाभिमाना साठी लढलेल्या शुरविरांच्या जयस्तंभाला वंदन करण्याचे नाटक करणारे राजकीय व सामाजिक नेते व त्यांचे चलेचपाटे एक मंच एक विचार व एकीकरणासाठी एकत्र का येत नसतील? जेथे समाजासाठी एकत्रच यायचे नाही, जेथे स्वाभिमाना ऐवजी स्वार्थाला म हत्त्व द्यायचे अशा लोकांचा व नेत्यांचा समाजाला काय फायदा? लाखोंच्या संख्येने गर्दी केलेले लोक कोणत्या ना कोणत्या नेत्याचे भक्त असतात. बर स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे हजारो राष्ट्रीय नेते आहेत परंतु हजारो राष्ट्रीय नेत्यांपैकी एकाचाही एखादा आम दार खासदार नाही तरीही स्वार्थी व स्वयंघोषित नेत्यांना स्वतःला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणवून घेताना थोडीही नैतिक भिती वाटत नसेल तर यांच्या कडे नैतिकता किती आहे हे दिसून येते. येथे दररोज बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणाऱ्या माणसांना डावलले जाते, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विटंबना होते, तरीही लोक स्वतः चे दुकान बंद करून समाजाच्या हितासाठी व देशाच्या संविधाना साठी एकत्र येत नाहीत. मग कोरेगांव भिमाला जाण्याचे नाटक कशाला? खरं तर आज नागपुर, मुंबई, औरंगाबाद किंवा कोरेगांव भिमा जाणे किंवा इतरही बौद्ध स्थळांना भेटी देणे हा एक इव्हेंट झाला आहे. सर्वसामान्य लोकही जायचे म्हणून जातात आणि राजकीय नेते गर्दीचा फायदा घेऊन स्वतःच्या दुकानाची जाहिरात करतात. कशाला पाहिजे वेग-वेगळे स्टेज? कशाला पाहिजे पक्ष, संघटनेच्या ना-वाने स्वतः चे मोठ मोठे फोटो असलेले बँनर? बँनर वर मोठमोठे फोटो टाकून आपले विचार आणि कर्म सिद्ध होत नाहीत. बँनर वर बाबासाहेब आंबेडकर व संबधीत कार्यक्रमां बद्दलची माहिती लहान आणि नेते व चलेचपाटे यांचे फोटो मोठे जसे की त्या शौर्यदिन साजरे व्हायला यांचेच मोठे योगदान आहे.

आजही समाजावर अन्याय अत्याचार होत आहे. आधुनिक अस्पृश्यता पाळली जात आहे. स्वरूप बदलले असले तरीही परिणाम मात्र पेशवाईचेच आहेत. असे असताना आपण एकत्र येण्याची तयारी दाखवून एकत्र येऊन लढण्याची तयार ठेवत नसु तर मग कोरेगांव भिमाला जाऊन किंवा मोठमोठ्या बँनरवर फोटो लाऊन फायदा काय? एकिने व स्वाभिमानाने लढले तर त्याचा फायदा समाजाला चिरकाल होतो याचा इतिहास असताना केवळ आपण देखावा करत असु तर आपण इमानदार वारस नाही हेच सिद्ध होते. आजही विद्यार्थी, नोकरदार, तरुण, व सामाजिक काम करणारे इमानद-ार सामाजिक कार्यकर्ते यांना या व्यवस्थेचा खुप त्रास आहे. जे स्वार्थी आहेत, स्वतः ची दुकानदारी करतात ते लोक खंडणी, मांडवली करून स्वतः चा उदरनिर्वाह करतात. यालाच शौर्य व स्वाभिमान म्हणायचे का? किमान मुंबई, नागपूर, औरंगाबाद, कोरेगांव भिमा सारख्या ठिकाणी तरी लोकांनी एकत्र येऊन आपली वैचारिक, सामाजिक एकिकरणाची ताकद दाखवून दिली तर राजकीय ताकद निर्माण होईल आणि त्याचा फायदा सर्वांना होईल. परंतु स्वतः च्या फायद्यामुळे आणि एकत्र आलोतर आपले राष्ट्रीय अध्यक्ष (शाखाध्यक्ष ची लायकी नसलेले) पद धोक्यात येईल की काय म्हणून विचारधारा व चळवळीला छिन्नविछिन्नीन करणारे लोक निर्माण झाले म्हणून कोणताही हेतु साध्य होताना दिसत नाही. पाचशे शुरविर योद्ध्यांनी आपला शत्रु ओळखून शत्रु विरोधात लढण्याची रणनीती आखली होती. फक्त ते वेळ आणि संधी शोधत होते शत्रुला पराभूत करण्याची. आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. आजचे स्वयंघोषीत नेत्यांना शत्रुची ओळख तर नाही परंतु जे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर, संविधान व चळवळ याला बदनाम करण्याचे प्रयत्न करत आहेत त्यांच्या च गोटात जाऊन आपले पोट भरत आहेत. एकदिवस स्वाभिमानी झालेले लोक प्रस्थापितांच्या पायरीवरचा श्वान होऊन कधी लाचारी करतील हेच कळत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन एखादा बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला छेद देणाऱ्या सोबत हातमिळवणी करत असेल तर तो किती लाचार झाला याची जाणीव होते. कोरेगांव भिमा जयस्तंभ एक इतिहास आहे. खुप मोठी प्रेरणा आहे. तो इतिहास आणि प्रेरणा आज वादात सापडली आहे. शुरविरांच्या जयस्तंभाला काही लोकांनी खाजगी संपत्ती म्हणून दावा केला आहे. हे सगळं सुरु असताना लाखों लोकांना त्याची माहीतीच नाही हिच मोठी शोकांतिका आहे. जयस्तंभ सध्या आपल्या ताब्यात नाही, एक जा-नेवारी साठी आपल्याला न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. परवानगी संपली तर आपण जयस्तंभा जवळ जाऊ शकत नाही. जयस्तंभ ला आपण सध्या रंगरंगोटी, सुशोभीकरण करू शकत नाही, काही लोक जयस्तंभ पाडण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आणि आपण फक्त एक दिवस गर्दी करून दुसऱ्या दिवशी थंड होतो तर काही लोक जयस्तंभ पाडावा असे वक्तव्य करत आ-हेत. आपण भावनिक होऊन एखाद्या च्या वक्तव्यावर हिंसक प्रतिक्रिया देतो. परंतु हिंसक प्रतिक्रिया देऊन काही फायदा नाही. यासाठी आपल्याला संविधानीक मार्गाने जयस्तंभाचे संरक्षण करावे लागेल तरच येणाऱ्या काळात आपण जयस्तंभ हा पाचशे शुरविरांच्या पराक्रम ाचे प्रतिक म्हणून सांगु शकु. एकदा जर स्तंभ आपल्या हातून गेला तर कोरेगांव भिमाला जाणे तर बंद होईल परंतु येणाऱ्या पिढीला आपण काय सांगणार? पा-चशे शुरविरांनी अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून अन्याया विरोधात आवाज उठवून विजय मि ळवला त्यांचे प्रतिक असलेल्या जयस्तंभाला आम्ही लाखोंच्या संख्येने दरवर्षी वंदन करायला जात होतो पण स्वार्थी वृत्ती आणि बेकीकरण यामुळे आम्ही आमची ताकद दाखवू शकलो नाही. असे बोलण्यात आपल्याला शुरता वाटेल का? यावर विचार केला तर मनात प्रश्न येतोच शुरविरांना वंदन करण्याचा अधिकार आहे का? प्रश्न, समस्या खुप आहेत. गरज आहे ती गर्दी पेक्षा गांभीर्याने एकत्र येऊन, एकिकरणाची ताकद दाखवून, संविधानीक मार्गाने आपला लढा मजबूत केला तरच आपण जयस्तंभ वाचवू शकतो. आणि समाजामध्ये स्वाभिमान व शौर्यही निर्माण करू शकतो.

अन्याय अत्याचार गाडून टाकण्यासाठी जिवाची पर्वा न करता अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून पेशवाई नष्ट करून जागतिक शौर्य सिद्ध करणाऱ्या जागतिक शुरविरांना स्वाभिमानी वंदन. सामाजिक व राजकीय एकी झाली तरच सामुहिक वंदन केल्याचे सार्थक होईल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळविली

सोलापूर : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेले ३५ हजार रुपये किमतीची काळ्या सिल्वर पट्टा असलेली हिरो स्प्लेंडर प्लस दुचाकी (क्रमांक एम एच १३ बी




एल ८२३९) चोरून नेल्याची घटना २७ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी सिद्धराम मनोहर इंगळे (वय ३०, रा.०९ नाईकवाडी नगर, अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील लॉट नंबर ५ स्वामी समर्थ हौससिंग सोसायटी यांच्या घरातून एक लाख ९० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना २७ डिसेंबर रोजी घडली. त्यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दुसऱ्या घटनेत लष्कर येथील राजेश वासुदेव पुजारी (वय ५९, रा. ५०५ दक्षिण सदर बझार, लष्कर) यांच्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने, लॅपटॉप आणि तांब्याची भांडी असा ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना २७ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी सदर बाझार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यास 'एक खिडकी' द्वारे ऑनलाईन परवानगी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पुढील १०० दिवसांमध्ये सांस्कृतिक कार्य विभागाने करावयाच्या कामाचा घेतला मुख्यमंत्र्यांनी आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाबरोबरच सांस्कृतिक कार्य विभागाशी निगडीत विविध माध्यमातून रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होते. हा विभाग सॉफ्ट पॉवर म्हणून काम करतो. त्यामुळे मराठी चित्रपटाचे सर्व चलछायाचित्रण मोठ्या प्रमाणात गोरेगाव येथील चित्रनगरीत व्हावे यासाठी आकारण्यात येणारे दर कमी करावे. कुठल्याही निर्मात्याला महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यासाठी एक खिडकीद्वारे तात्काळ ऑनलाईन परवानगी देण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्ष सोहळ्याचे विशेष आयोजन करून त्याचे कार्य सर्व शाळा, कॉलेज, महाविद्यालयांपर्यंत पोहोचले पोहोचण्यासाठी वर्षभराचे नियोजन करण्याच्या सूचना करून मुख्यमंत्री म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य देशभरात खूप मोठे असल्याने त्यांच्यावर एक चांगला व्यावसायिक चित्रपट तयार करण्यात यावा. या चित्रपटासाठी शासनाकडून अनुदान देण्यात यावे. हर घर संविधान अंतर्गत प्रत्येक घरात संविधान पोहचले पाहिजे, अशाही सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



# निफाड महाविद्यालय येथे अंतर महाविद्यालय कयाकिंग व कॅनोइंग स्पर्धेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी

माजी मंत्री वनाधिपती विनायक दादा पाटील यांचे स्वप्न होते की, कुंदेवाडी येथील त्यांच्या मूळ गावी नदीकिनारी विभागीय व राष्ट्रीय जलतरण स्पर्धा केंद्र असावे. त्या अनुषंगाने तेथे स्पर्धा घेण्यात याव्यात. आज विनायकदादाचे स्वप्न क ग दा मोरे निफाड महाविद्यालय बोट क्लब व नाशिक विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कयाकिंग व कॅनोयीग स्पर्धेच्या आयोजनातून पूर्णत्वास आल्याचे मोठे समाधान मिळाले असून खेळाडूंनी यातून प्रेरणा घेत घवघवीत मोठे यश प्राप्त करावे अश्या शुभेच्छा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी दिल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मविप्र निफाड महाविद्यालय बोट क्लब व नाशिक विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कयाकिंग व कॅनोयीग स्पर्धेचे आयोजन कुंदेवाडी बोट क्लब येथे करण्यात आले होते प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस व्ही जाधव यांनी स्पर्धा आयोजन उद्देश स्पष्ट केला तसेच क्रीडा विभागाचे अनेक विद्यार्थी विविध स्पर्धेमध्ये राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले आहेत. त्यामुळे क्रीडा विभागाची यशोदायी कामगिरीबद्दल कौतुक केले. यावेळी मविप्र संचालक विजय नाना पगार, वैकुंठ पाटील, अशोक कुंदे, प्राचार्य प्रोफे(डॉ.) सुरेश जाधव, डॉ. एस व्ही खैरनार, ज्ञानोबा ढगे मुख्याध्यापिका श्रीमती एस.एस. जाधव,नाशिक जिल्हा क्रीडा विभाग समिती सचिव डॉ.नरेंद्र निकम, उपसचिव मनीष देवरे , डॉ हेमंत पाटील डॉ.ज्ञानेश्वर गडाख, डॉ.सुनील धोंडगे , प्रा. राकेश वडजे, श्री निरभवणे, चेतन कुंदे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, सर्व संघ व्यवस्थापक, स्पर्धक उपस्थित होते.

**सामाजिक मेळावा, दिनदर्शिका-२०२५ प्रकाशन सोहळा थाटामाटात संपन्न**

**अनेक वाद्यवृंद संच, आणि विविध महापुरुष, शेतकरी, संत यांच्या भूमिकांचा सादरीकरण**

# २५ व्या वर्धापनदिनानिमित्त कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा विक्रोळी - घाटकोपरतर्फे भव्य मिरवणूक










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/(केतन भोज) : कुणबी समाजोन्नती संघ मुंबई (रजि.) शाखा विक्रोळी-घाटकोपरतर्फे शाखेच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य मिरवणूक, सामाजिक मेळावा, दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन सोहळा विक्रोळी पार्क साईट शिवाजी मैदान, विक्रोळी (प.)मुंबई -७९ येथे बळीराज सेना राष्ट्रीय अध्यक्ष अशोकदादा वालम, कुणबी मध्यवर्ती संघ सरचिटणीस कृष्णा वणे,कुणबी युवा अध्यक्ष तथा संघ सहसचिव माधव कांबळे यांच्या हस्ते पार पडला.

रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३-३० वा.राम नगर शिवसेना शाखा क्रमांक १२७ येथून मिरवणूक सुरु होऊन ती अमृत नगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. महिला लेझीम, खालू बाजा, अनेक वाद्यवृंद संच, आणि विविध महापुरुष, शेतकरी, संत यांच्या भूमिका सादरीकरण करत पुढे बँक ऑफ इंडीया मार्गे सुजाता हॉटेल आशिर्वाद सोसायटी जवळून संदेश विद्यालय ते विद्यादीप शाळेकडून खाली साईबाबा मंदीर असे करून श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे समारोप साठी सायंकाळी ६-३० वा पोहचली. या कार्यक्रमाला शाखा अध्यक्ष तथा ईशान्य मुंबई उपाध्यक्ष बळीराज सेनाचे सोनू शिवगण, शाखा सचिव तथा सचिव विधानसभा घाटकोपर बळीराज सेना सचिन शिवगण, शाखा खजिनदार उपसचिव विधानसभा घाटकोपर बळीराज सेना चंद्रकांत भोज, शाखा संस्थापक तथा घाटकोपर विधानसभा अध्यक्ष बळीराज सेना आत्माराम बाईत, महिला शाखा अध्यक्षा अश्वीणी बाईत,महिला शाखा सचिव अपर्णा जागडे, प्रमुख पाहुणे म्हणून बळीराज सेना राष्ट्रीय अध्यक्ष अशोकदादा वालम, कुणबी मध्यवर्ती संघ सरचिटणीस कृष्णा वणे,कुणबी युवा अध्यक्ष तथा संघ सहसचिव माधव कांबळे, वासुदेव साळवी-बळीराज सेना सिंधुदुर्ग प्रमुख, सौ.गोंधळी, शिवसेना (उबाठा)चे संजय भालेराव, शिवसेना (शिंदे )डॉ. सुभोध भावधाणे, काँग्रेसचे राम गोविंद यादव आणि सर्व बळीराज सेना पदाधिकारी महिला पदाधिकारी, सर्व कुणबी समाजोन्नती संघ संलग्न विभागिय शाखा पदाधिकारी, सदस्य, युवक मंडळ पदाधिकारी, सदस्य, विवाह मंडळ पदाधिकारी, सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करून महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात केली.कार्यक्रम सुत्रसंचालन सचिन शिवगण, चंद्रकांत भोज यांनी केले तर प्रस्तावना सत्यवान शिंदे( बळीराज सेना सिंधुदूर्ग उपाध्यक्ष घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष)यांनी केली यावेळी प्रकाश वालम, दिलिप कातकर, चंद्रकांत गोवळकर, अमर डीके, सुरेश मांडवकर, रामानंद कणेरी, दिनेश नावले, मनिष वालम, शंकर मेणे, जनार्दन नात्की, अशोक नात्की, राजेश बने, अरविंद हरमले, वसंत राऊत, प्रताप काटकर, थोरे, निंबरे, खामकर सर्व कार्यकारीणी पदाधिकारी कार्यकर्ते, सदस्य आणि सभासद, महिला कार्यकर्त्या पदाधिकारी, सदस्य तसेच प्रसिद्धी प्रमुख शांताराम गुडेकर, केतन भोज यांच्यासह कुणबी समाजोन्नती संघ मुंबई या मातृ संस्थेचे पदाधिकारी, युवक मंडळ पदाधिकारी, बळीराज सेना पदाधिकारी, कु.स.संघ शाखा विक्रोळी-घाटकोपर पदाधिकारी, सदस्य, सभासद,महिला मंडळ पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, आजी -माजी पदाधिकारी, सदस्य, वधू - वर सूचक मंडळ पदाधिकारी,हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते. दरम्यान उपस्थित सर्व मान्यवर यांचा शाल, पुष्प करंडक, सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सर्व कुणबी समाज बांधव,भगिणी,युवावर्ग सर्वांनी आपला बहुमुल्य वेळ समाज्यासाठी देऊन सहकार्य केल्याबद्दल कु.स. संघ मुंबई विभागीय शाखा विक्रोळी - घाटकोपर पदाधिकारी,सदस्य आणि सभासद यांच्यातर्फे सर्वांचे आभार व्यक्त व्यक्त करून स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पेशव्यांना शिकस्त देणारे महार सैनिक !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ब्रिटिश साम्राज्याने ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर यांच्या प्रमुखांशी शांतता करार वा तह करून त्या-त्या संस्थानांचा भाग आपल्या राज्याला जोडला होता. १३ जुन १८१७ रोजी पेशवे आणि गायकवाड घराण्यात महसुलावरून वाद झाला त्यात बाजीराव पेशवे यांनी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतली व बडोदा संस्थानाचा मोठा भाग पेशवाईत समाविष्ट केला. परंतु यासाठी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतल्यामुळे अप्रत्यक्षपणे तो भाग ब्रिटिशांनी आपल्या राज्यास जोडला. यामुळे मराठा साम्राज्य ब्रिटिश अधिनस्त झाले आणि पेशवे केवळ नामधारी उरले. अल्पावधीतच पेशव्यांनी ब्रिटिशांना नमवण्याचा प्रयत्न खडकीची लढाई केला परंतु ब्रिटिशांनी तेथेही पेशव्याचा पराभव केला. ही लढाई ५ नोव्हेंबर १८१७ रोजी झाली होती. त्यानंतर पेशवे यांनी तेथून सातारा येथे पळ काढला आणि ब्रिटिशांनी पूर्णपणे पुण्यावर ताबा मिळवला. पुणे हे चार्लस बार्टन बर व कर्नल जनरल स्मिथ यांच्या नेतृत्वाखाली होते. आणि ते पेशव्यांचा पाठलाग करत होते. दरम्यान कर्नल स्मिथ याला भिती वाटत होती की पेशवा तेथूनही निसटून कोकणात जातील व तेथे राज्य करतील, म्हणून त्याने कर्नल बर याला कोकणात आणखी कुमक पाठवण्यास सांगितली. आणि एक जास्तीची कुमक पुण्याजवळील शिरूर येथे ठेवण्यास सांगितली. दरम्यान पेशवे कर्नल स्मिथचा पाठलाग चुकवून निसटून जाण्यात यशस्वी झाले परंतु दक्षिणेकडून कर्नल थेओफिलस प्रिझलर सैन्यासह तयार होताच, ते पाहून पेशव्यांनी मार्ग बदलला आणि पूर्वेकडे चालत नाशिकच्या वायव्य भागातून पुढे सरकले आणि कर्नल स्मिथ त्यांच्यावर हल्ला करेल या भीतीने ते पुन्हा पुण्याकडे वळले. डिसेंबर १८१७च्या अखेरीस कर्नल बरला बातमी समजली की पेशवे पुण्यावर चालून येत आहेत तेव्हा त्याने शिरूर येथील सैन्याला मदतीसाठी तयार राहण्यास सांगितले ते सैन्य पुढे सरसावले आणि त्यांची लढाई कोरेगाव भिमा या गावात झाली.

पेशवा दुसरा बाजीराव नासिककडे न जाता ओझरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून ३० डिसेंबर रोजी चाकण येथे येऊन पोहचला, अशी बातमी स्मिथ यास कळली. पूर्वी कोंकणांतून मुंबईकडून इंग्रज फौज येत होती तिला गाठावे किंवा पुण्यावर येऊन ते शहर एकदम हस्तगत करावे असा बाजीरावाचा बेत असल्याचे स्मिथ यास दिसून आले, दोन्ही गोष्टी इंग्रजांस बिकटच होत्या. पुण्यास इंग्रजांचा बंदोबस्त अगदींच तात्पुरता होता. त्याने आपल्या मदतीस शिरूरहून जास्त फौज बोलावली होती, त्यावरून कॅ. स्टाँटन थोडे इंग्रज सैन्य बरोबर घेऊन ता. ३१ डिसेंबर १८१७ रोजी रात्री ८ वाजता शिरूरहून निघा, तो दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता कोरेगांवजवळ येऊन उतरला. तेथील टेकडीवरून त्याला पेशव्याची प्रचंड



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

फौज भीमा नदीच्या काठीं दिसली. स्टाँटनची बातमी बापू गोखल्यास होतीच. घोडनदीहून वरील इंग्रज फौज पुण्यास येत होती तिची बाजीरावाशीं अकस्मात गाठ पडली. बापू गोखल्यास श्रीमंतानी आज्ञा केली, की आज लढाई करून आम्हास पुढे जाण्यास मार्ग करून द्यावा. गावास लहानशी तटबंदी होती तेथे इंग्रज आश्रयार्थ गेले. त्यावर दुसऱ्या बाजूने मराठ्यांनी तोफांचा मारा सुरू केला. जागा अडचणीची असल्यामुळे तोफा बंद करून मराठ्यांकडील अरबांनी व पायदळांनी इंग्रजांवर चालून घेतले. तेव्हा संगिनीचे व तरवारीचेच युद्ध झाले. दोन्ही बाजूंचे भरपूर नुकसान झाले. रात्री ९ वाजेपर्यंत लढाई चालून मराठ्यांचे सैन्य आपल्या छावणीकडे परत आलें. सकाळी इंग्रजांच्या सैनिकांनी पाहिले तर मराठा सैन्य निघून गेल्याचे दिसले. इंग्रजांचे २७५ मारले गेले तर १७५ जखमी झाले, त्यापैकी बहुतेक होतकरूच होते. मराठ्यांचे सुमारे ५००-६०० लोक पडले. बाजीराव तर अगोदरच जेजुरीच्या वाटेने साताऱ्याकडे निघाला होता. पाठीमागून जनरल स्मिथ येत असतां त्यास ओझरच्या घाटात त्रिंबकजी डेंगळ्याच्या रामोशांनी इतके सतावून सोडले की, २ जानेवारी १८१८ रोजी जेमतेम तो चाकणला येऊन पोचला. त्याच दिवशी कॅ स्टाँटन हा जखमी झालेले लोक व उरलेली फौज बरोबर घेऊन परत शिरूरच्या छावणीत गेला.

कोरेगावची लढाई ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई १ जानेवारी १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण ८३४ सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ. स्टाँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत 'बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी'चे सुमारे ५०० महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने २५००० सैनिक होते, ज्यातील २०००० घोडदळ, ५००० पायदळ सतत तैनात असत. कंपनी सरकारच्या सैन्यांनी हल्ला करु नये यासाठी प्रत्येकी ६०० सैनिकांच्या तीन तुकडया असत. ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरे करीत होते. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. दुसरे बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखालील सैन्य कंपनीच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना, अनपेक्षितपणे त्यांना कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते. पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे २००० सैनिक पाठवले.

कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ १२ तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली. ही लढाई इंग्रज-मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज - मराठा युद्धाचा भाग होती. या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना, अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले.

१८०० च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेली होती. कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी पेरणे फाटया जवळ पुणे-अहमदनगर रोड वर ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या ४९ सैनिकांची नावे कोरली. यामध्ये २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे – 'जपश ेष ींहश ढीर्ळींशिीं ेष ींहश ईीळींळीह ीू ेष ींहश एरींं'.

हेन्री टी प्रिंसेप यांनी लिहिलेल्या 'हिस्टरी ऑफ द पॉलटिकल अँड मिलिट्री ट्रान्जॅक्शन्स इन इंडिया' पुस्तकात या लढाईचा संदर्भ आहे.




महार समाजातल्या माणसांचा समावेश असलेल्या ईस्ट इंडिया तुकडीच्या धाडसाचे वर्णन या पुस्तकात आहे. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध (विशेषतः पूर्वाश्रमीचे महार), अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते. आजच्या दिनी अशा शूर सैनिकांना मानवंदना......!




## थोडक्यात...

### तू माझ्याकडे घुरून का बघितला म्हणून तरुणास मारहाण

सोलापूर : भवानी पेठ येथे तू माझ्याकडे घुरून का बघितला म्हणून शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना २८ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी ओमकार किरण मरगल (वय १९, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ) यांने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्याच्या फिर्यादीवरून शेखर दुबय्या ईराबत्ती, सागर मरगल, राहुल मरगल, श्रीनिवास मरगल (सर्व रा.जुना विडी घरकुल) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे नीलकंठेश्वर मंदिराच्या बाहेर बसला होता. त्यावेळी संशयित आरोपी क्रमांक एक ते चार हे सर्वजण मंदिरात वाढदिवस साजरा करून बाहेर आले. त्यावेळी यातील संशयित आरोपी क्रमांक चार याने फिर्यादीस विनाकारण तू माझ्याकडे घुरून का बघितला म्हणून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी फिर्यादी त्यांना मी तुमच्याकडे कशाला बघू असे म्हणताना संशयित आरोपी क्रमांक तीन यांनी कमरेचा बेल्ट काढून फिर्यादीस मारहाण केली.या मारहाणीत फिर्यादी खाली पडून त्याच्या डोक्यात खरचटले आहे असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल खरात हे करीत आहेत.

## विभागीय आयुक्त आणि पोलीस आयुक्तांनी केली विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या तयारीची पाहणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसेच पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पेरणे येथे विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची पाहणी केली. यावेळी पोलीस सह आयुक्त रंजन कुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, उप विभागीय अधिकारी यशवंत माने आदी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी विजयस्तंभाचे सुशोभीकरण, गर्दी व्यवस्थापन, रांगा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने केलेले नियोजन, आजूबाजूच्या जागेचे सपाटीकरण तसेच उभारण्यात येत असलेली शौचालये, उभारलेले पेंडाल, पोलीस सूचना मनोरे आदींच्या उभारणीची तयारी आदीची पाहणी करून संबंधितांना सूचना दिल्या. उपस्थित विविध संघटनांचे प्रतिनिधींशीही त्यांनी संवाद साधून त्यांच्या सूचना जाणून घेतल्या.

## टी.ए. पाटील स्कूलच्या अद्वैत जाधवची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : पडघा (बातमीदार) : तालुक्यातील समतानगर पडघा येथील अद्वैत जाधव याची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. भारतातील वाय.एस.सी. एल. या यंग स्टार्स क्रिकेट लीगमध्ये १४ वर्षांखालील वयोगटात महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. दिल्ली, नोएडा येथे या क्रिकेट स्पर्धा आयोजित केली होती. यावेळी अद्वैत अमोल जाधव याने उत्कृष्ट गोलंदाजी करून महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. त्याच्या या चमकदार कामगिरीमुळे त्याची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे.

अद्वैत अमोल जाधव हा टी.ए.पाटील इंग्रजी मिडीयम स्कूलचा विद्यार्थी असून इयत्ता सहावी मध्ये शिकत आहे. त्याबद्दल टी.ए.पाटील इंग्रजी मिडीयम स्कूलच्या वतीने जीवन विद्या प्रसारक शिक्षण मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष शशांक तांबोळी,खजिनदार यशवंत गायकवाड , मुख्याध्यापक रामचंद्र थोरात , उपमुख्याध्यापिका ममता शेलार,तर शिक्षकांनी अद्वैत जाधव जाधवचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस टी.ए. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल कडून शुभेच्छा देण्यात आल्या.

## पेपर विक्रेता ते संपादक : पत्रकारांच्या सुख दु:खात धावणारा पत्रकार

# महाराष्ट्रातील पत्रकारांचे नेतृत्व : डॉ. विश्वासराव आरोटे








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एक वृत्तपत्र विक्रेता ते वार्ताहर अन एक वार्ताहर ते स्व दैनिकाचा संपादक, ग्रामीण भागातील तालुका पातळीवरील पत्रकार संघटना ते देश पातळी वरील पत्रकार संघटनेचे सरचिटणीस, शिक्षणासाठी झालेली परवड ते अमेरिकन विद्यापीठाची डॉक्टरेट असा चित्रपट कथानकातील प्रवास ज्यांचा वाटतो ते म्हणजे पत्रकारांचं चालत बोलत व्यासपीठ डॉ. विश्वासराव आरोटे होय...

पत्रकारिता करताना निस्वार्थी पणाची भावना अंगीकारून पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा अमृतवेल वाढविण्याचे काम व ग्रामीण पत्रकारांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करून देणारे नेतृत्व म्हणजे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे हे होय.

विश्वासराव आरोटे हे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असणाऱ्या कळसूबाई च्या शिखर रांगा मधील अहिल्यानगर जिल्ह्यातील चितळवेढे ता. अकोले या छोट्याशा डोंगर कुशीतील आणि प्रवरामाईच्या तिरावर असलेल्या गावी त्यांचा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती अतिशय गरिबीची होती. प्राथमिक शिक्षण जन्मगावी तर माध्यमिक शिक्षण मा. मधुकरराव पिचड माध्यमिक विद्यालय राजुर येथे पूर्ण केले तर महाविद्यालयीन शिक्षण अकोले महाविद्यालयात पूर्ण केले.

परिस्थिती सामान्य असल्यामुळे शिक्षण घेत असताना सकाळी चितळवेढे येथून दूध टाकण्याचे व वर्तमानपत्र वाटण्याचे काम करित असे. वर्तमानपत्र वाटत असताना वाचनाची आवड निर्माण झाली. वर्तमानपत्र वाचता वाचता आपण पण पत्रकार व्हावे असे मनात इच्छा निर्माण झाली. पत्रकारीतेची झालेली ओळख आज त्यांना उच्च पदावर घेऊन गेली. ग्रामीण भागात वृत्तपत्र पोचवून ग्रामीण भागातील खप वाढवायचा असेल तर त्या भागातील समस्या समजून घेऊन वृत्तपत्रात त्याची मांडणी होणे आवश्यक आहे याची जाणीव विश्वासरावांना झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागातूनच आपल्या पत्रकारीतेचा श्रीगणेशा केला आणि ग्रामीण भागातील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ध्येयवेडी स्वप्ने उराशी बाळगून कर्तव्य करत राहिले यावेळी ग्रामीण भागातील वास्तव मांडताना अनेक अडीअडचणी आल्या. परंतु मुळातच अकोले तालुक्याला विचारांचा वारसा लाभलेला असल्यामुळे पत्रकारीता क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांशी त्यांची विचारसरणी जुळली. मार्गदर्शनाची दिशा मिळत गेली. कर्तृत्व आणि नेतृत्व याचा सुरेख संगम अस्तित्वात आला. बातमीदारी त्यांना मोठ्या पदावर घेऊन गेली. वार्ताहर म्हणून अनेक वृत्तपत्रांमध्ये काम केल्या नंतर तालुका प्रतिनिधी आणि नंतर विभागीय कार्यालयाचे उपसंपादक म्हणून त्यांनी 'दैनिक गांवकरी' या उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकाची जबाबदारी यशस्वीरीत्या पेलली. गांवकरीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची, या भागातील ग्रामस्थांची विश्वासार्हता जपली. लेखणीला चालना देता देता ग्रामीण भागातील वास्तव मांडतांना व वृत्तपत्रात काम करत असताना ग्रामीण भागातील पत्रकारांशी त्यांची नाळ जोडली गेली त्यातूनच ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्यांची उकल झाली. समस्या सोडवण्यासाठी काही तरी केले पाहिजे या उद्देशाने संघटन बांधणी सुरू केली. त्यांचे प्रश्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून सातत्याने मांडले. पत्रकारीता करत असतानाच ग्रामीण भागातील पत्रकारांशी देखीलत्यांची नाळ जोडली गेली. या पत्रकारांच्या समस्या त्यांना आपल्या समस्या वाटू लागल्या. या समस्या सोडविण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे सारखे वाटत होते. त्यांनी ग्रामीण भागात काम करणार्या पत्रकारांची मोट बांधली. सर्वांना बरोबर घेऊन अकोले तालुका ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. या पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांसाठी खर्या अर्थाने कार्य सुरु केले. हे काम करत असतानाच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजयजी भोकरे यांचा संपर्क आला. दोघांचेही ध्येय एकच.. पत्रकारांच्या समस्या सातत्याने मांडून त्यासाठी राज्यस्तरावर नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करणे. ध्येय्य एकच असल्याने या जोडगोळीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून एकत्रित काम सुरु केले.

पत्रकारांसाठी चालविल्या जात असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी राज्यस्तरीय अधिवेशने घेतली. जिल्ह्यात, तालुक्यात विविध मेळावे घेतले. राज्यभरातील सर्व जिल्ह्यातील पत्रकारांना या पत्रकार संघामध्ये सामावून घेतले. प्रत्येकाला संघाचे ओळखपत्र देऊन नवी ओळख दिली. सर्वच जिल्ह्यातील पत्रकारांचा विमा काढून खर्या अर्थाने पत्रकार संघ या पत्रकारांसाठी काम करत असल्याचा विश्वास निर्माण केला. संघटनेच्या पदाधिकार्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अहमदनगर जिल्हाध्यक्ष आणि नंतर राज्य सरचिटणीस या पदावरकाम करण्याची संधी दिली. राज्य कार्यकारिणीवर काम करतानाच त्यांचे काम अतिशय जोमाने सुरु झाले.

स्पर्धा परीक्षांबरोबरच क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या गुणवंतांचा राज्यस्तरावर गौरव पत्रकार संघाच्या माध्यमातून केला जात आहे. पंडीत श्रीश्री रविशंकरजी यांनाही पत्रकार संघाने गौरविले आले. हलाखीची परिस्थिती असणार्या पत्रकारांना औषधोपचारासाठी व इतर गरजा भागविण्यासाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही विश्वासराव आरोटे यांनी केला आहे. अशा राज्यभरातून अनेक पत्रकारांना संघटनेने आर्थिक मदत केली आहे.

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, बाळासाहेब विखे, सुशिलकुमार शिंदे, समाजसेवक अण्णा हजारे, राज्यपाल के. विद्यासागरराव, विधानसभा सभापती हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना. राधाकृष्ण विखे पाटील, शिवसेना प्रमुख व मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, रामदास आठवले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत आर. आर. पाटील, दिवंगत गोपीनाथ मुंडे, उपमुख्यमंत्री आ. अजित पवार आदींकडे त्यांनी सातत्याने पत्रकारांच्या विविध समस्या मांडल्या.

पत्रकारांना संरक्षण मिळावे यासाठी संरक्षण कायदा व्हावा यासाठी ते नेहमीच आग्रही राहीले. पत्रकारांवर होणार्या हल्लूयांचा निषेध करत आरोपींना अटक होईपर्यंत पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही श्रमिक पत्रकारांप्रमाणेच ॲक्रीडीशनकार्ड मिळावे, एस. टी. बस तसेच रेल्वेसारख्या विविध सवलती मिळाव्यात, शासनाने त्यांचा आरोग्य विमा काढावा, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती द्याव्यात, पत्रकारांना निवासासी व्यवस्था उपलब्ध करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न विश्वासराव आरोटे करत आहेत. कोणताही पत्रकार असो त्यांना माऊली म्हणुन संबोधतात त्यामुळे ते अधिक जिव्हाळ्याचे सबंध प्रस्थापीत करतात.

पत्रकार संघाने मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर केलेल्या आंदोलनाची दखल राज्यपाल विद्यासागरराव यांनीही घेतली होती.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने वसंतराव मुंडे व डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिक्षा भूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई अशी पत्रकार संवाद यात्रा काढली. २२ मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना दिले. पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांचे महामंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय या सरकारने घेतला.

त्यांच्या कार्यकाळात अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असुन त्यांनी केलेल्या कार्याचा तो सन्मान आहे. पत्रकारांना विमा, हेल्मेट वाटप, आर्थिक मदत, कोरोना काळात अन्नधान्य व कपडे वाटप, गुणवंताचा सन्मान असे अनेक सामाजिक कार्याची दखल घेऊन अमेरिकन विद्यापीठाने डॉक्टरेट प्रदान केली.

जे का रंजले गांजले त्यासी जो म्हणे आपले याप्रमाणे गरिबांना मदतीचा वसा ते अविरत पणे चालवत आहे.

आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने परमेश्वराकडे एकच मागेन की त्यांना भरपुर आयुष्य, चांगले आरोग्य मिळो. वाढदिवसाच्या निमित्ताने खुप खुप शुभेच्छा....!

**संकलन:- श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा प्रसिद्धी प्रमुख,**
**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, नगर जिल्हा.**